## -:- ऋ ण नि र्दे श -:-

शिवाजी विद्यापीठाला सादर करण्यासाठी प्रस्तुत प्रबंधिकेचा अभ्यास करताना मला ज्यांचे सहाय्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करणे मी आद्यकर्तव्य समजतो.

ही लघुप्रबंधिका मी पूर्ण करु शकलो याचे बव्हंशी श्रेय शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रपाठक सन्माननीय डॉ. विश्वनाथ शिंदे यानाच द्यावे लागेल. त्यांनी माझ्यावरील स्नेहामुळे वैयक्तीक मार्गदर्शन करण्यापासून ते ग्रंथसंपदा देण्यापर्यन्त सहकार्य केले म्हणूनच ही प्रबंधिका मी पूर्ण करु शकलो. त्यांच्या ऋणातून - उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटेल.

प्रस्तुत प्रबंधिकेचे लेखन करताना सांगलीच्या श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. रोहिणी तुकदेव यांच्याशी विषयानुषंगाने केलेली चर्चा उपयुक्त ठरली.

कवलापूर येथील पंडित नेहरु विद्यालयाच्या प्रा. अरुणा जंगम यांची प्रेरणा व प्रोत्साहन मला लाभदायक ठरले.

खडतर जीवनाशी सामना देत असतानासुध्दा माझ्या विषयीचे एक वेगळे स्वप्न ज्यानी उराशी बाळगले, ते स्वप्न या प्रबंधिकेच्याद्वारे मी साकार करु शकलो ते माझे आई-बाबा व माझी ताई - श्रीमती राजकुंवर नेकलेस लोंढे [केडगांव, जिल्हा-पुणे], यांचा आदराने उल्लेख करतो. त्यांनी मला कायमचेच ऋणात ठेवले आहे.

या प्रबंधिकेच्या लेखनासाठी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व सांगलीचे श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाचे ग्रंथालय, यांचे मोलाचे सहाय्य लाभले.

श्री. अविनाश आप्पा मोरे.

# प्रा स्ता वि क

शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनांच्या स्वरूपाचा "अक्करमाशी" व "बारामाशी" च्या अनुषंगाने शोध घेणे या प्रस्तुत लघुप्रबंधिकेचा उद्देश आहे.

गेल्या काही वर्षात दलित लेखकांची आत्मकथने मोठया प्रमाणावर प्रकाशित झाली. त्यामध्ये शरणकुमार लिंबाळे यांचा उल्लेख केला जातो. दलित आत्मकथनांचा विचार करावयाचा झाला तर,शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनांचा विचार करणे अपरिहार्य ठरते. दलित आत्मकथनांमध्ये लिंबाळ्यांची आत्मकथने अनेक दृष्टीने वेगळी आहेत. असे सकृतदर्शनीच जाणवते. त्यांच्या आत्मकथनांचे वैशिष्टय म्हणजे वेगळी अनुभवविश्व, त्याची प्रांजळ अभिव्यक्ती, भाषिक वैशिष्टये म्हणून मराठी भाषेमध्ये अनेक नव्या शब्दांची भर या आत्मकथनांनी घातली आहे. वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीनेही लिंबाळ्यांची आत्मकथने वैशिष्टयपूर्ण ठरतात. असे असले तरी अद्यापपर्यंत शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनांच्या स्वरूपाचा विस्ताराने विचार केला गेलेला नाही. काही ठिकाणी स्फुट स्वरूपात केलेले तुरळक प्रयत्न आढळतात. म्हणून दलित आत्मकथनांच्यामध्ये वेगळे स्थान प्राप्त केलेल्या या लेखकाच्या आत्मकथनांची स्वरूपवैशिष्टये विस्ताराने अभ्यासणे प्रस्तुत ठरेल; अशा धोरणाने निवडलेला हा विषय युक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

खरं तर, शरणकुमार लिंबाळे यांच्या सगळया आत्मकथांच्या स्वरूप वैशिष्टयांचा विचार करणे हा विषय मोठा आहे. परंतु लघुप्रबंधिकेची मर्यादा ध्यानात घेता या विषयाला थोडे मर्यादित करणे आवश्यक ठरेल. या विचाराने लिंबाळयांची प्रत्येक कलाकृती घेऊन तिचे भलेबुरेपण आजमावणे अशी पध्दती न स्वीकारता आत्मकथेच्या रूपाच्या घटकांच्या अनुषंगाने विचार करण्याची पध्दती

प्रस्तुत प्रबंधिकेत स्वीकारली आहे. तरीही शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनांच्या स्वरूप वैशिष्टयांचे केलेले विवेचन सामग्र नाही; हे नम्रपणे नमूद करणे आवश्यक आहे.

शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनांच्या स्वरूपांचा विचार करताना अनुभवविश्व,व्यक्तिचित्रे, निवेदन पद्धती व भाषा इत्यादी घटकांच्या अनुषंगाने "अक्करमाशी" व "बारामाशी" या कलाकृतींची चिकित्सक पाहाणी करून निष्कर्ष नोंदविले आहेत.

........